# रा.भा.शिर्के प्रशाला, रत्नागिरी

या शाळेत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक मिळून ३९ शिक्षक व ११ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. या शाळेची विद्यार्थी संख्या १५२८ एवढी आहे. प्रशालेचे विद्यार्थी अलौकिक गुणांच्या आधारे उत्तुंग गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याचाच हा थोडक्यात आढावा.

इयत्ता १०वी (२०२०) निकाल–१००%, कु.कांबळे वैभव बाबासाहेब ९६.८०%, कु.पंडित आदित्य आनंद ९७.४०%, कु.वाडेकर आर्यन सुहास ९५.६०%, कु.साळवी श्रुती संदेश ९५.२०%, कु.नवाळे पियुषा प्रकाश ९५.००%, कु.कुळकर्णी श्रावणी महेश ९३.६०%, विशेष प्राविण्य (Dist.)८५, प्रथम श्रेणी–१००, व्दितीय श्रेणी–७३, तृतीय श्रेणी–१५, एकूण–२७३

* शिष्यवृत्ती विभाग: *पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (२०२०)– प्रविष्ट –५१, गुणवत्ताधारक–०८
* पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (२०२०) प्रविष्ट विद्यार्थी–६०, गुणवत्ताधारक विद्यार्थी–२०
* NMMS आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा : प्रविष्ट–०६, गुणवत्ताधारक–२, सन २०–२१: प्रविष्ट–१३, गुणवत्ताधारक –३
* डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा : लेखी परीक्षेचा निकाल १००% लागला. दुसऱ्या फेरीसाठी प्रात्याक्षिक परीक्षेसाठी इ.९वी मधील २ विद्यार्थ्यांची निवड झाली.
* NSO,IMO इत्यादी परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊल विद्यार्थ्यांनी उत्तम यश प्राप्त केले आहे.
* स्पर्धा विभाग – शाळेतील विद्यार्थी पुढील स्पर्धामधे सहभागी झाले.
* न्यू एज्युकेशन सोसायटी, द्वारा फाटक हायस्कूल रत्नागिरी श्री.दासनवमी उत्सवानिमित्त कथाकथन स्पर्धा.
* बसणी पंचक्रोशी मार्फत डॉ.शंकर घाणेकर एकपात्री अभिनय स्पर्धा.
* टाटा बिल्डिंग इंडिया आयोजित निबंध स्पर्धा.
* एस.एस.एम.ई विकास संस्थान, मुंबई यांच्या मार्फत राज्यस्तरीय चित्रकला व निबंध स्पर्धा.
* रेणुका प्रतिष्ठान रत्नागिरी मार्फत लोकमान्य टिळक स्मृती शताब्दी वर्षानिमित्त कथाकथन स्पर्धा.
* संस्कृत भारती –(जि. रत्नागिरी व सिंधूदुर्ग) संस्कृतदिनानिमित्त स्तोत्र पठण स्पर्धा.
* My NEP Competition–वक्तृत्व स्पर्धा राष्ट्रीय स्तर.
* जे.एस.डब्ल्यू आयोजित रत्ना.जिल्हा मर्या.कथाकथन स्पर्धा.
* राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र शासन आयोजित कला उत्सव स्पर्धा.
* रत्नागिरी खबरदार आयोजित छोटे किल्लेदार स्पर्धा.
* राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त निबंध स्पर्धा गट

* जी.जी.पी.एस.इंग्लिश मिडियम स्कूल रत्नागिरी संस्थांतर्गत गीतगायन स्पर्धा–

* आम्ही बालकवी राज्यस्तरीय स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा (८वी ते १०वी)

* मानव विकास संस्था, रत्ना. आयोजित कोरोना व लॉकडाऊन आधारित तालुकास्तरीय निबंध स्पर्धा.

* पंचायत समिती रत्नागिरी, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, रत्नागिरी ५सप्टेंबर शिक्षक दिनाच्या निमित्ताने–Thank a Teacher अभियानाअंतर्गत निंबध स्पर्धा.

* काव्यलेखन स्पर्धा–विषय कोविड १९ * घोषवाक्य स्पर्धा

* पंचायत समिती, शिक्षण विभाग, रत्नागिरी यांचे मार्फत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त स्पर्धा .

* क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती महिला शिक्षण दिनानिमित्त भाषण स्पर्धा व काव्यलेखन स्पर्धा.

* शिक्षक दिनानिमित्त निबंध स्पर्धा.

* विद्यार्थी मदत संघटना मंडणगड आयोजित जिल्हास्तरीय गडकिल्ले माहिती स्पर्धा.

* सर्वकष विद्यामंदिर, रत्नागिरी मराठी राजभाषा दिनानिमित्त आंतरशालेय स्पर्धा.

* जिल्हा परिषद रत्नागिरी महिला व बालविकास विभाग आयोजित स्पर्धा २०२१–विषय 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'

*महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांचेतर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

* JSW फाऊंडेशन व रत्ना.जिल्हा विज्ञान मंडळ आयोजित 'औषधी वनस्पती–नोंदवही (ऑनलाईन) स्पर्धा

* जिल्हास्तरीय ऑनलाइन विज्ञान प्रदर्शन (पी.एस.बने इंटरनॅशनल स्कूल, साडवली) आयोजित VIDEO MAKING स्पर्धा

* Inspired Award स्पर्धा, पर्यावरण संस्था, रत्ना.आयोजीत निबंध स्पर्धा.

* भारत सरकार महावितरण आयोजित 'ऊर्जा संवर्धन सप्ताह साजरा करण्यात आला. यासाठी 'ऊर्जा क्लब'ची स्थापना करण्यात आली. ऊर्जा क्लबच्या माध्यमातून स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यातही विद्यार्थी सहभागी झाले.

वरील सर्व कार्यक्रमांचे आयोजन करताना कोविड –१९ चा विचार करुन सर्व नियमावलीचे पालन करुन विद्यार्थ्यांनी शिक्षक व पालक यांच्या मदतीने व्हिडिओ व साहित्य अपलोड केले. मंडळातर्फे मिळालेल्या रकमेतून पारितोषिक वितरण करण्यात आले.

* शालेय किशोरावस्था जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम (सालसेप) अंतर्गत किशोरवयीन मुला–मुलींसाठी बालिका दिन, मातापालक उद्बोधन वर्ग घेण्यात आले. किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन वर्ग, राष्ट्रीय विज्ञान दिन, बेटी बचाओ बेटी पढाओ, मासिक पाळी दिन इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

* चित्रकला विभाग – आर्ट सर्कल आणि आसमंत बेलेव्होलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने Online गणेशमूर्ती स्पर्धेमध्ये ५ विद्यार्थी बक्षीसपात्र ठरले. तसेच रत्नागिरी जिल्हा प्रशासन आयोजित चित्रकला व पोस्टर स्पर्धा,

लायन्स क्लब ऑफ रत्नागिरी आयोजित पीस पोस्टर स्पर्धा, १४ नोव्हेंबर बालदिनानिमित्त पोस्टर स्पर्धा, रत्नागिरी जिल्हा कलाध्यापक संघ रत्नागिरी चित्रकला स्पर्धा,पर्यावरण संस्था आयोजित चित्रकला स्पर्धा,कला उत्सव (बालदिवस सप्ताह).इ.मध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

* शारीरिक शिक्षण विभाग – या शैक्षणिक वर्षात ऑफलाईन व ऑनलाईन स्पर्धांचे कोरोनाचे नियम पाळून विविध स्पर्धा घेण्यात आल्या. बुध्दिबळ स्पर्धा, कॅरम स्पर्धा, खो–खो, तायक्कांदो या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले.

* सांस्कृतिक विभाग – या वर्षातील प्रशालेचे सांस्कृतिक विभागाचे योगदिन, शाहू महाराज जयंती, गुरुपौर्णिमा, लोकसंख्या विस्फोट इशारा दिन, लो.टिळक जयंती, कारगिल विजय दिन, माध्यमिक शालांत परीक्षा बक्षिस पात्र विद्यार्थी गुणगौरव समारंभ, लो.टिळक पुण्यतिथी, रक्षाबंधन, संस्कृतदिन, क्रांतिदिन, स्वातंत्र्यदिन, क्रीडादिन, शिक्षक दिन, हिंदी भाषा दिन, ओझोन दिन, कै.बाबुराव जोशी जयंती, कै.मालतीबाई जोशी स्मृतीदिन, म.गांधीजी व ला.शास्त्रीजी जयंती, वाचन प्रेरणा दिन, हात धुवा दिन, एकता दिन, संविधान दिन, महापरिनिर्वाण दिन, अल्पसंख्यांक दिन, ग्राहक दिन, महिला शिक्षण दिन (सावित्रीबाई फुले जयंती), स्वा.विवेकानंद जयंती, भूगोल दिन, छ.शिवाजी महाराज जयंती, स्वा.सावरकर स्मृती दिन, कै.अरुआप्पा जोशी स्मृती दिन, राष्ट्रीय विज्ञान दिन, महिला दिन, डॉ. आंबेडकर जयंती, कै.बाबुराव जोशी स्मृतीदिन इत्यादी कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीले साजरे केले गेले.

* स्काऊट–गाईड विभाग – रा.भा.शिर्के प्रशालेत गेली अनेक वर्ष स्काऊट–गाईड हे पथक चालू आहे शैक्षणिक वर्ष २०२०–२१ यावर्षी स्काऊटचे ६युनिट व गाइडचे ६ युनिट तयार करण्यात आले. स्काऊटर म्हणून श्री.आयरे सर, श्री.महाले सर, श्री.जाधव सर,व गाईड म्हणून सौ.यादव मॅडम व अभ्यंकर मॅडम यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली.शै.२०२०–२१ या वर्षी स्काऊट–गाईड मार्फत अनेक स्पर्धा व उपक्रम आयोजित करण्यात आले. सर्व स्पर्धा ऑनलाईन स्वरुपात झाल्या. निसर्गाचे जतन, घोषवाक्य, कोरोनावर आधारित कविता स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले या मध्ये अनेक स्काउट–गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

* व्यवसाय मार्गदर्शन – या विभागाअंतर्गत प्रशालेत online वेबिनार्स आयोजित करण्यात आली. दि.२४/०६/२० रोजी पंचायत समिती रत्नागिरी व शिर्के प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेतील इ.१०वी च्या विदयार्थ्यासाठी करीअर मार्गदर्शन हा Online पध्दतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी समुपदेशक श्री.व्हि.बी.सूर्यवंशी,श्री.एस.डी.शिर्के आणि श्री.एम.आर.कडवईकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि दि.१४/०३/२१ रोजी Asmi Youth Career advisor या संस्थेच्या वतीने समुपदेशक श्री. अशोक पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

*** विविध क्षेत्रातील उल्लेखनीय –**

* प्रशालेतील अटल टिंकरिंग लॅब च्या माध्यमातून 'हॅन्ड सॅनिटायझर मशीन' प्रशालेतील इ.७ वी तील कु.निरंजन सावरे व कु.आर्यन सावंत या विद्यार्थ्यांनी बनविले. अशा प्रकारचे विविध उपक्रमाचे मार्गदर्शन श्री. अटल टिंकरिंग लॅब मधून वर्षभर करण्यात आले. यामध्ये श्री.मुंडेकर व्ही.एस.,श्री.पडवेकर एस.एस व इतर विज्ञान शिक्षक यांनी मार्गदर्शन केले.

* सावरकर प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने पूर्ण वर्षभर इ.७ वी व ८वीच्या विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन संस्कारवर्गाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये श्री.आयरे एस.वाय, श्री.मयेकर व्ही.एस. यांनी मार्गदर्शन केले.

* दर रविवारी योग आणि शारिरीक प्रात्यक्षिके यांचे वर्षभर मार्गदर्शन तसेच रथसप्तमी निमित्त १ लाख सूर्यनमस्कार संकल्प यासाठी श्री.आयरे आर.वाय, श्री.मयेकर व्ही.एस यांनी मार्गदर्शन केले.

* रोटरी क्लब तर्फे ५ सप्टेंबर शिक्षक दिनी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.गुळवणी जी.जी यांना Nation Builder Award या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

* कोविड योद्धा म्हणून काम केलेल्या शिक्षकांचा अनुभव प्रथम क्रमांक:-श्री.एस.वाय.आयरे

* ऑनलाईन उपक्रमांमध्ये प्रयोगशील उपक्रमांबाबत माहिती प्रथम क्रमांक:-सौ.साखळकर एस.डी.

* कोरोना-१९ च्या पार्श्वभूमीवर नवीन प्रवेशासाठी पालकांना शाळेपर्यंत येणे शक्य व सुरक्षित नसल्याने शाळेची प्रवेश प्रक्रिया पाहिल्यांदा ऑनलाईन करण्यात आली त्याला पालकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

* कार्यानुभव अंतर्गत 'उत्पादक क्षेत्र' अंतर्गत ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना भेळ, सँडविच, राख्या बनविणे, कागदी व कापडी फुले बनविणे यांचे प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले.

* सेवानिवृत्ती - श्री.दशरथ आण्णा पाटील हे प्रशालेतील प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

* श्रद्धांजली- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या अहवाल वर्षात दिवंगत झालेले रा.भा.शिर्के प्रशालेतील निवृत्त शिक्षक श्री बने बी.व्ही., श्री.वहाळकर एस.डी., श्री.पाटील डी.ए., सेविका श्रीमती शिंदे जी.जी. तसेच प्रशालेवर नितांत प्रेम करणारे दिवंगत ज्ञात, अज्ञात देणगीदार, हितचिंतक, माजी विद्यार्थी यांनाही आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

या अहवाल वर्षात कोरोनाचे संकट असतानाही सर्व विद्यार्थी,पालक सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले प्रशालेला सदैव मार्गदर्शन देणारे सर्व संस्थापदाधिकारी, नियामक मंडळ, पालकवर्ग, माजी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग या सर्वांचा प्रशालेतर्फे ऋणनिर्देश करीत आहोत.

**श्री. विजय साखळकर**
शालेय समिती अध्यक्ष

**श्रीमती गायत्री गुळवणी**
प्रभारी मुख्याध्यापक